म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५३६

श्रावणसरी
रसिका देशमुख

# श्रावणसरी

REFBK-0024833
REFBK-0024833

संदर्भ काव्य
२५३६
१२८३३
१।३।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी
वर्गणी भरावी लागेल.

( क्र. मा. पहा )
५०००-३-८४

# श्रावणसरी

सौ. रसिका विठ्ठल देशमुख

REFBK-0024833
REFBK-0024833

ज्ञानेश

ज्ञानेश प्रकाशन, ६, नवनिर्माण, प्रतापनगर, नागपूर-२२

प्रकाशिका ● सौ. शैलजा काळे
ज्ञानेश प्रकाशन
६ नवनिर्माण, प्रतापनगर
नागपूर–४४००२२

प्रकाशन पुष्प ४९
ऑक्टोबर १९८५
प्रथमावृत्ती

लेखिका ● सौ. रसिका विठ्ठल देशमुख
'यशवंत' ७१, स्वातंत्र्य सैनिक वसाहत
औरंगाबाद ४३१००१

मुद्रक ● श्री. कानेटकर
रवीन्द्र मुद्रणालय,
यशवंत स्टेडियम,
नागपूर ४४००१२

मुखपृष्ठ चित्रकार ● श्री. कमल शेडगे, मुंबई

मुखपृष्ठ छपाई ● मॅजेस्टिक प्रिंटिंग प्रेस,
ऑफसेट डिव्हिजन, महाल
नागपूर–४४०००२

SRAVANSARI
Mrs. Rasika Vitthal Deshmukh

● मूल्य पंधरा रुपये मात्र.

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

# प्रस्तावना

'श्रावणसरी' काव्यसंग्रहातली बव्हंश सगळी कविता सहजस्फूर्त दिसते. सहजपणाच्या इतक्या खाणाखुणा तिच्यामध्ये आढळतात की, सहजतेची जाणीवही होऊ नये. ह्या कवितेमध्ये सहजता इतकी मुरून राहिली आहे. स्वाभाविकच कवितेची निर्मिती, त्याचे थोडे बहुत भान असे दृश्य असले तरी त्यासाठी च्या प्रक्रियेची जाणीव, संस्करण, कलाकुसर वगैरे काव्योपचारांची निकड दिसत नाही. निरव सायंकाळी फेरफटका मारता मारता कुठून तरी येणारा रातराणीचा सुगंध अंगामनाला विंधून दूर दूर पसरत जावा आणि जाता जाता जाणवतही रहावा; तशा सहजवृत्तीने ही कविता आकाराला आल्याचे जाणवत राहते. साहजिकच हसऱ्या-दुखऱ्या जीवनवृत्तीतून भावलेल्या अनुभवांचे मुलाकार अगदी अनभिज्ञपणे ही कविता शोधताना आढळते. त्या पलिकडे जाऊन ती स्वत: कष्टत नाही की कुणाला कष्टवीतही नाही.

साहजिकच ' कविता जन्मते कशी ? ' याची जाणीव नसणारी पण नकळत अनुभवाचे मूलाकार शोधणारी 'श्रावणसरी' मधली कविता खोलवर मनाच्या विविधरंगी विलसितांचा वेध घेऊ पाहते मात्र हा शोध/वेध मूलत: कुतूहलजनक आहे. 'श्रावणसरी'तल्या मनाला अधीर कुतुहल पडले आहे ते 'हे असं का ? ते तसं का ? हे असंच का घडतं ? ते तसच का होतं ? जे असं घडलं-बनलं ते तसं का नाही घडलं किंवा बनलं ?' – याचं आणि त्या घडण्या-बनण्यात आपण एक आहोत, याचंही, हे कुतूहल शमतंन हे खरं; पण त्या संबंधातला कौतुकाचा गुंता इतका जबर की, त्यातून दाटणारा उमाळा शब्द बनून कवितेत कधी उमटतो हे समजत नाही. इतके हे मुलायम नाजुक शल्य-कौशल्य. मात्र शमणारे हे कुतूहल तात्पुरते. शाश्वत कुतूहल कायमचे चालूच असते. तसे ते शमणारे नसतेच. जिथे ते शमले असे वाटावे तिथेच तर नव्या कुतूहलाला सुरूवात व्हावी; अशी स्थिती असते. प्रक्रिया चालूच राहते. कळत-नकळत. त्यातून कवितेचा गुलमोहर फुलतो. बहरतो; टवटवीत होऊन सामोरा येतो. हे कधी आणि कसे होते हे कळतच नाही. कळायच्या आतच सारे घडून जाते. 'श्रावणसरी'तली बव्हंश कवितेची नस ही अशी कळण्या–नकळण्याच्या सीमारेषेवरली आहे. कवयित्री सौ. देशमुख यांनी आपला अनुभव पुढील शब्दात सांगितला आहे :

अनुभवाची शब्दफुलं
अंगावर टपकत गेली
कल्पनेच्या राज्यात
भावनांच्या धाग्याने
माळत गेले एक एक शब्दफूल
आणि कळत–नकळत
एक एक कविताही जुळत गेली !

साहजिकच 'श्रावणसरी' तर या कवितेच्या फुलण्याला निरागसपणाचा एक स्पर्श आहे. कधी ती संदर्भ घेऊन येते तर कधी संदर्भाविना. कधी अर्थाची झुंबरे लेऊन तर कधी त्याचा गंधही नसता. कधी अनामिक बंधांनी जखडून जाऊन तर कधी तृप्तीचे चांदणे लेऊन. कधी चिरस्मृतींचे अश्रू पिऊन तर कधी स्वप्नातल्या वाटा हाताशी धरुन. कधी अनंत अपराध पापणीआड करून तर कधी कदाचित् पुढचा क्षण आपला नसेलही या जाणिवेचे भान राखून—रेशमी मुलायम पाकळ्यांवर अलगद दंव सांडत जावे, तसे श्रावणसरी'त घडते.

ह्या घडण्याला भावव्याकुळ आर्ततेची किनार चिकटून आहे. भावकोमल प्रीतिभावनेची आणि निसर्गमग्न मनाची त्यास साथ आहे. उभयपक्षी रंगगंध एकमेकांत, मर्यादित प्रमाणात का होईनात पण एकात्म होऊन आले आहेत. अश्रूंनी लिहिलेली कविता अश्रूतच भिजून जाणारी असली तरी त्यातून उभारून येणारे भान कधी तरी कळण्याची शक्यता प्रकट करणार आहे हर्षभरित पण उदास अशी ही कविता दर्दभरे गहिरेपण ठळकपणे मांडते. 'श्रावणसरी'त ती सांगते.

**तू आहेस तरी कोण ? कळत नाहीय मला**
**दगड तर काही म्हणता येत नाही तुला**
**कारण माझ्या हृदयमंदिरातला**
**मीच देव केलाय तुला . . .**

किंवा. . . .

'स्पर्शतराणा' मध्ये ती बोलते,

क्षणक्षण सरकत गेला
मनात टेऊन दुखरी स्मृती
तरीही का रे आळवते मी
ओठांवरती स्पर्शतराणा ?

तुझ्या नि माझ्या प्राक्तनांच्या ओंजळीत 'श्रावणसरी'ने ही हृदयकथा जपली आहे वेड्या पाऊलखुणांचे संदर्भ शोधत. कधीही शून्य न बनण्याचा इशारा करीत. ओठाआड दडलेले पुष्कळ मी सांगू कसे तुला ? — असा व्याकुळ प्रश्न करीत. एकूणच ही हृदयकथा हृद्य आहे.

'श्रावणसरी' तील कवितेचा 'खेळ' आश्वासक आहे. सातत्य, परिश्रम आणि पूर्णतेची आस इत्यादी गुणांची ओढ तिला क्रमाने समृद्ध बनवील; आणि मराठी सारस्वताची लक्षणीय साथ करील. अशी अपेक्षा आहे.

१३ ऑक्टोबर, ८५

मराठी विभाग
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद : ४३१००४

डॉ. एस. एस. भोसले

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५३६
२४८३३
३।२।८५
ग्रं. शाखा (स्थळ प्रत)

## मनोगत

. . . आपल्याला हे असं काही लिहावं लागेल ह्याची स्वप्नंसुद्धा मी कधी पाहिली नव्हती. माझ्यावर कोसळलेल्या 'श्रावणसरी' हळव्या सुखद वाटणाऱ्या किंवा दुःखाचे चटके बसवणाऱ्या तरीही हव्याहव्याशा वाटणाऱ्या. मी मन भरुन साठवलय त्यांना माझ्या मनाच्या कप्प्यात. आज त्यांची झलक पुस्तकरुपाने तुमच्या-समोर येतेय. ज्या सुखाची आपण कल्पनासुद्धा करु नये तेच सुख आपल्यासमोर उभे रहावे—ह्याचाच निखळ आनंद मला उपभोगायला मिळणार आहे. अर्थात हा पहिलाच प्रयत्न असल्याने ह्यात बऱ्याचशा त्रुटी असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. मी सुरुवातीला लिहायला लागले तेव्हा बऱ्यावाईट टीका झाल्याच. सुरुवातीला हशाही झालाच. पण मी लिखाण सोडले नाही. कुठलीही कविता लिहिली की मी ती माझ्या बहिणीला-जयंतीला दाखवी. तिला त्याचं भारीच कौतुक असे. तिने मला एका वाढदिवसाला स्वतःच्या खाऊच्या पैशाने डायरी घेऊन दिली आणि लहान असूनसुद्धा मोठ्यांना लाजवेल असा सल्ला दिला – 'जे स्वतःसाठी लिहितेस त्याचा उपयोग इतरांना होऊ दे. अशाच वरचेवर खूप कविता तुझ्या हातून लिहून होऊ देत' झाले. त्याच दिवसापासून माझ्या कवितांचा गौप्यस्फोट झाला. आईवडिलांनी खूप कौतुक केले आणि मग पुढे प्रत्येक काव्यस्पर्धेत भाग घेण्यास भाग पडले.

मैत्रिणींना तर गंमत वाटायची. त्या नेहमी विचारीत, तुला कविता जन्मते कशी ? मलाही असा प्रश्न खूप वेळा पडायचा, कविता लिहिली कशी जाते ? अशी अचानकच, तुम्हालाही वाटतच असेल त्याचंही उत्तर मला एके दिवशी मिळालं अगदी सहज –हळव्या मनाच्या पडसादांनी–

आज का उदासवाणे
सांज छेडीते तराणे
ओघळलेले दव फुलांतील
शब्द शब्द होता
अशी जुळते मनांत कविता

अशाच लिहिल्या सगळ्या कविता. भावनाप्रधान मनाचे हुंकार आहेत हे. कुणाच्या आवडण्याचा कधी विचारच केला नाही. जे मनांत आलं ते खरडलं कागदावर. माहित आहे माणसाने एवढे हळवं होऊन चालत नाही पण मनाला आवर घालणंच कठीण जातं. –साधी झाडाला पानगळ लागली तरी वाईट वाटतं आणि नवी पालवी फुटताना पाहून तेवढाच आनद होतो.

मला निसर्गाचं भयंकर वेड आहे. जे डोळ्यात साठवते ते कुंचल्याच्या सहाय्याने रंगाची उधळण करुन त्याला मूर्त रुप देण्याचा बऱ्याच अंशी निष्फळ ठरणारा प्रयत्न करते. जेव्हा अशक्य असेल तेव्हा लेखणीचा आधार घेते. पण खूप वेळा शब्दसुद्धा कमी पडतात. अशा वेळी मनाला हूरहूर लागून रहाते.

मी माझ्या कवितांबद्दल कांहीच लिहीणार नाही. त्या प्रत्यक्ष तुमच्यासमोर आहेतच. वाचकांनी त्यावरच्या प्रतिक्रिया मला कळवल्या तर त्यातच मला जास्त आनंद आहे.

मला प्रसिद्धीच्या झोतात येणं फारसं कधी आवडलंच नाही. पण घरच्यांच्या आग्रहामुळे क्वचितच मी कविता 'दैनिक मराठवाडा' किंवा 'देसीकार लेणे' ला पाठवल्या. प्रसिद्ध झाल्याही आणि आज माझी अंधारात चाचपडणारी कविता प्रकाशात आणण्याचे काम महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने केले. ह्यात सर्वात मोठा वाटा आहे माझे पती– विठ्ठल देशमुख यांचा. माझे पूर्वाश्रमीचे नांव विजया चौधरी. लग्नानंतर त्यांनी ते बदलून रसिका ठेवले. ह्यातच त्यांच्या रसिकमनाची पहिली झलक पहावयास मिळाली. त्यांनी मला या कामासाठी खूप प्रोत्साहन दिले, नवी उमेद दिली. आपल्याच माणसाचे आभार काय मानायचे ?

महत्वाचे म्हणजे मनापासून सहकार्य लाभले प्रा. डॉ. एस्. एस्. भोसले सरांचे. मी कवितांचे बाड सर्वच्या सर्व प्रथम कुणाला दाखविले तर ते सरांना. माझ्यातील कवीमनाची जाणीव त्यांनीच मला करुन दिली. त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.


ज्ञानेश प्रकाशनने 'श्रावणसरी' प्रकाशित करण्याची जबाबदारी घेतली त्याबद्दल सौ. शैलजा काळेंचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. श्री. कमल शेंडगेसारख्या ख्यातनाम चित्रकाराचे मुखपृष्ठ 'श्रावणसरी' ला लाभले. हा केवळ योगायोगच. मी त्यांची मनापासून आभारी आहे.

शेवटी बहिणी, भाऊ, मैत्रिण जे माझ्या कवितांचे पहिले वाचक, त्यांनी मनापासून दाद देवून कवितांतील चूका समजावून सांगितल्या. त्यांचे आभार, आणि वेळोवेळी असेच मार्गदर्शन मला लाभावे हीच अपेक्षा.

**सौ. रसिका देशमुख**

ज्यांच्या हाताने बाराखडी गिरवण्यास शिकले,
आयुष्याची एकवीस वर्षे ज्यांनी माझी प्रत्येक
भावना जोपासली, कधी रागावून तर कधी
प्रेमाने, कठोरातले कठोर सत्य ज्यांनी मला
समजावून दिले, त्या माझ्या
प्राणप्रिय व. ति. सौ. आई
व
व. ति. काकासाहेबांना
त्यांच्याच सहवासात बहरलेला काव्यसंग्रह
'**श्रावणसरी**' अर्पण

**– विजू**



अशाच लिहिल्या सगळ्या कविता. भावनाप्रधान मनाचे हुंकार आहेत हे. कुणाच्या आवडण्याचा कधी विचारच केला नाही. जे मनांत आलं ते खरडलं कागदावर. माहित आहे माणसाने एवढे हळवं होऊन चालत नाही पण मनाला आवर घालणंच कठीण जातं. —साधी झाडाला पानगळ लागली तरी वाईट वाटतं आणि नवी पालवी फुटताना पाहून तेवढाच आनंद होतो.

मला निसर्गाचं भयंकर वेड आहे. जे डोळ्यात साठवते ते कुंचल्याच्या सहाय्याने रंगाची उधळण करुन त्याला मूर्त रुप देण्याचा बऱ्याच अंशी निष्फळ ठरणारा प्रयत्न करते. जेव्हा अशक्य असेल तेव्हा लेखणीचा आधार घेते. पण खूप वेळा शब्दसुद्धा कमी पडतात. अशा वेळी मनाला हूरहूर लागून रहाते.

मी माझ्या कवितांबद्दल कांहीच लिहीणार नाही. त्या प्रत्यक्ष तुमच्यासमोर आहेतच. वाचकांनी त्यावरच्या प्रतिक्रिया मला कळवल्या तर त्यातच मला जास्त आनंद आहे.

मला प्रसिद्धीच्या झोतात येणं फारसं कधी आवडलंच नाही. पण घरच्यांच्या आग्रहामुळे क्वचितच मी कविता 'दैनिक मराठवाडा' किंवा 'देसीकार लेणे' ला पाठवल्या. प्रसिद्ध झाल्याही आणि आज माझी अंधारात चाचपडणारी कविता प्रकाशात आणण्याचे काम महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने केले. ह्यात सर्वात मोठा वाटा आहे माझे पती— विठ्ठल देशमुख यांचा. माझे पूर्वाश्रमीचे नांव विजया चौधरी. लग्नानंतर त्यांनी ते बदलून रसिका ठेवले. ह्यातच त्यांच्या रसिकमनाची पहिली झलक पहाव्रयास मिळाली. त्यांनी मला या कामासाठी खूप प्रोत्साहन दिले, नवी उमेद दिली. आपल्याच माणसाचे आभार काय मानायचे ?

महत्वाचे म्हणजे मनापासून सहकार्य लाभले प्रा. डॉ. एस्. एस्. भोसले सरांचे. मी कवितांचे बाड सर्वच्या सर्व प्रथम कुणाला दाखविले तर ते सरांना. माझ्यातील कवीमनाची जाणीव त्यांनीच मला करुन दिली. त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

ज्ञानेश प्रकाशनने 'श्रावणसरी' प्रकाशित करण्याची जबाबदारी घेतली त्याबद्दल सौ. शैलजा काळेंचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. श्री. कमल शेंडगेसारख्या ख्यातनाम चित्रकाराचे मुखपृष्ठ 'श्रावणसरी' ला लाभले. हा केवळ योगायोगच. मी त्यांची मनापासून आभारी आहे.

शेवटी बहिणी, भाऊ, मैत्रिण जे माझ्या कवितांचे पहिले वाचक, त्यांनी मनापासून दाद देवून कवितांतील चूका समजावून सांगितल्या. त्यांचे आभार, आणि वेळोवेळी असेच मार्गदर्शन मला लाभावे हीच अपेक्षा.

**सौ. रसिका देशमुख**

ज्यांच्या हाताने बाराखडी गिरवण्यास शिकले,
आयुष्याची एकवीस वर्षे ज्यांनी माझी प्रत्येक
भावना जोपासली, कधी रागावून तर कधी
प्रेमाने, कठोरातले कठोर सत्य ज्यांनी मला
समजावून दिले, त्या माझ्या
प्राणप्रिय व. ति. सौ. आई
व
व. ति. काकासाहेबांना
त्यांच्याच सहवासात बहरलेला काव्यसंग्रह
'**श्रावणसरी**' अर्पण

**– विजू**





अनुभवांची शब्दफुलं
                अंगावर टपकत गेली.
कल्पनेच्या राज्यात
                भावनांच्या धाग्याने
माळत राहिले एक एक शब्दफूल
                आणि कळत न कळत
                एक एक कविताही जुळत गेली...

## अशाच एका संध्याकाळी

●

तुझं तटस्थपण
गुलमोहराला बोचलंय.
मी निखळ हसताना
गुलमोहर फुलता फुलता
बावरला होता
अशाच एका उदास संध्याकाळी ... ...

●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५३६ / २८८३३ / १।२।८६
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

## असं का व्हावं ?

●

पक्ष्यांनी उडावं आकाशात
भराऱ्या मारत थव्याथव्यानं.
चुकून एखादा पक्षी
मागेच विसरुन जावा ?

चांदण्यांनी झगमगावं
प्रकाशावं, हसावं,
एखादयाच चांदणीच्या नशीबाला
ढगांचं सावट यावं ?

स्वरमैफीलीत रात्र रंगत जावी,
रात्रीसोबत हवा धुंद व्हावी.
मधूनच एखादा स्वर
उगाच असा का बेताल व्हावा ?

सूर्यानं उगवावं,
फुलांनी फुलावं,
सर्वांना हसवावं,
स्वःताशी हसत हसत चढत जावं.
आणि संध्याकाळ होताच
क्षितिजापलीकडे
एका उदासीनतेत
बुडून जावं
असं का व्हावं ?

●

# पाऊलखुणा

●

माझ्या क्षितिजापर्यंत
तू उगाच संदर्भहीन पाऊलखुणा
रूजवत गेलास
ज्यांचे अर्थ
त्या मातीलाही ठाऊक नव्हते.
माझ्या मनांत मात्र
रुतत गेल्या पाऊलखुणा
मुलायम गवतातून चालताना
पायाला काटे रुतावेत तशा.

●

# का ?

●

चांदणे प्याले ओठांनी
तरीही मन अतृप्त का ?
चंद्र नितळ कोजागिरीचा
भासतो मज उदास का ?

●

# अनिश्चितता

●

तुझी आठवण येताच
ही रात्र अशी
बेवारशी का बरं झाली ?
अनामिक बंधाच्या बाहूत
एक सावली विसावली.

इतक्या असूनही चांदण्या
का सुनासुना भासे आसमंत ?
एक अनिश्चितता बोचे मनाला
कधी होणार तिचा अंत ?

तुझ्या स्मृतीपायी माझ्या भोवती
सारे गतीत क्षण गोळा झाले.
सांग परतवू कसे तयांना
मी हतबल आता झाले... ...

●

## हळव्या वाटा

●

चेहऱ्यावर फुललेलं
एक म्लान हसू,
डोळ्यांत भरलेत काठोकाठ
चिरस्मृतींचे आसू.

ओठावर विश्वसल्या
तुझ्या शद्बलाटा,
डोळ्यांतील अश्रूत हरवल्या
त्या हळव्या वाटा.

त्या हळव्या वाटा !
आपण चाललेल्या
नसताही त्या आपल्या
आपण स्वप्नात पाहिलेल्या... ...

●

## निर्धार

•

माझी वाट संपून गेलीय
पाहण्याची किंवा चालण्याची.
तरीही मला चालायचे आहे
डोळ्यात एक निश्चय जागवत.

अपेक्षांचं क्षितीज गाठायचं आहे.
रस्ता खूप कठीण आहे.
मनातील सारी दुःखे लपवून
जगाला सोबत द्यायचीय
काही सुखद क्षणांची.

साऱ्यांचेच अपराध पापणीआढ करायचेत.
डोळ्यांतील कढत अश्रूंत
कटू स्मृतींना विरघळून टाकायचे आहे.
येणाऱ्या प्रत्येक क्षणांमागे
गोड स्मृतींना ठेवायचे आहे
कोणालाही न दुखवता.
कदाचित पुढचा क्षण
माझ्यासाठी नसेल म्हणून... ...

•

## प्राजक्तफुलं

●

तुला माझ्यापासून दुरावायचंच होतं
तर मग इतका
जवळ तरी का रे आलास ?
हळवं मन पिळवटून टाकणारे
आवाज तरी कारे दिलेस ?
हृदयाला भिडणारी साद तरी
का रे घातलीस ?
माझी पूजा संपण्याच्या आतच
साऱ्या प्राजक्तफुलांचे
देठ गळून गेले.
म्हणजे तू स्वतःला
सुवास साठवून ठेवणाऱ्या पाकळ्या
आणि मला
देठ समजला होतास की काय ?

●

# स्वप्नांसोबत.....

•

जीवनाच्या वळणवाटा
जवळजवळ संपत आल्याहेत.
आयुष्याचा गाव
पैलतीरी दिसतोय.
संध्याकाळ होत आलीय
सूर्य मालवत चाललाय.
स्वप्नांचे दिवे आता
पेटवायला हवेत.
अलीकडे मी, पलीकडे गाव
मधे एक वहाता प्रवाह–
कुठे संथ, कुठे खळाळणारा
मला पार करायचाय.
अंधार दाटून आलाय,
स्वप्नांचा दिवा पुरेनासा झालाय,
म्हणून सारी स्वप्नेच पेटवून दिलीत
आणि स्वप्नांसोबत मी ही ... ...
जळून जातेय ... ...

•

## क्षितिज

●

क्षितिजापलीकडे थांबले मी
तुझी वाट पहात
तुझ्या सांगण्याप्रमाणे.
तो सूर्य, कदाचित
माझ्या अपेक्षांचाही असेल
त्याच्या सोबतीनं तू येणार म्हणून
प्रत्येक सकाळी, कितीतरी गुलाल उधळला.
खरं सांग,
तुला 'क्षितिज' पार करता येणार नव्हते तर
मला तरी तेथपर्यंत
कशाला पोचवलेस ?
त्या क्षितिज गाठण्याच्या जिद्दीत
मी मनाचं बंदिस्त दालन
केव्हाच पार केलंय.
आता परत फिरणं अशक्य आहे.
आपल्यातली प्रचंड तफावत
कमी करण्यासाठी फक्त एकच कर
चालत रहा.
उद्या निश्चितच तू क्षितिज ओलांडशील
त्यावेळी
क्षितिजापलिकडील स्वप्नविश्वात
मी तुझ्या वाटेकडे
डोळे लावून बसलेली असेन.

●

# का ?

•

ही अजाण पाखरं
जाताना
असा लळा का लावून जातात ?

भारावलेल्या चंद्रतारका
हृदयाशी
असं नातं का जोडून जातात ?

रंग गहिरा होताच आकाशाचा
मन असं
हेलावून का जातं ?

अस्वस्थ संध्याकाळी
उदासपणे डोळ्यात
पाणी का दाटून येतं ?

प्रश्न असंख्य असतात,
पण उत्तर
एकाचही का नसतं ?

ह्या प्रश्नांच्या वादळात
मन असचं शिणून जातं.
का ?

•

## साद

•

नियतीच्या चक्रात
सापडलेले आपण–
कुणाच्या विरहाने कुणाशी भेट झालेली.
तुटलेले धागे पुन्हा जुळताहेत.
विणल्या चाललय धाग्याधाग्याने
एक घरटं पहिल्यासारखंच.
जे मनानं जुळलं
त्यातच पूर्ण जीव अडकणारं.
कितीही स्वतःला दूर केलं तरी
मन आकर्षित होतंय.
कदाचित गुंततही जात असेल.
मी साद घालतेय
हृदयाच्या ओढीनं–
तुझा कितपत प्रतिसाद मिळेल
याचीच वाट पहातेय.

•

## गुलमोहर

•

रस्त्याच्या कडेला
उभा गुलमोहर.
स्वतः उन्हाचे चटके खात
दुसऱ्यांना सावली देतोय.
उन सोसतोय,
पाऊस पितोय,
सोसाट्याच्या वादळातही
न डगमगता उभा आहे तटस्थ.
ध्येय, निष्ठा उरी बाळगून,
दुःखाला पचवून,
सुखाने डवरतो, फुलतो
दुसऱ्यांना आनंद देण्यासाठी.
गुलमोहरा, खरं सांगू
तुला पाहिलं की असं वाटतं,
जगाचे काही नियम
तुला कळलेच नाहीत.

•

# ' तू '

●

'तू'
तुलासुद्धा आजवर
न उलगडलेलं कोडं
मी उकलू पहातोय.
प्रेम सामावणारे तुझे डोळे
त्या सागरापेक्षाही मला
उदात्त वाटताहेत.
म्हणून तुझं नाव
माझ्या शब्दावळीत गोवण्याचा
प्रयत्न करतोय.
तुझ्या मनाचे असंख्य गुंतागुंतीचे धागे
उकलताना
माझ्या मनाचे धागे त्यात
कसे गुंतत गेले, कळल नाही.
एवढ मात्र निश्चित की
हृदयाचा एक कप्पा
फक्त तुझाच आहे.
कसं झालं, काय झालं, कळलं नाही.
फक्त एवढंच कळलंय
तुला शोधता शोधता
मीच हरवलोय.

●

# आपलं प्रेम

•

उंच डोंगरालाही
सामावून घेणारा
धुक्याचा प्रचंड सागर.
आणि धुक्याच्या लाटांना
स्वतःत सहजतेने सामावून
घेणार गर्द आकाश.
डोंगरमाथ्यांना तो ढगांचा अलगद स्पर्श
कसा वाटत असेल ?
जशी तुझी आर्त नजर
मला स्पर्शून गेली होती
माझं ध्येय डोंगर तर नाहीना ?
माझी अपेक्षा धुक्याचा लोट तर नाहीना ?
तू तर आकाश आहेस
पण आपलं प्रेम
धुक्याचा प्रचंड सागर नकोय–
कुणालाच किनारा नसणारी
एक अनंत पोकळी.

•

## गीत

●

दाट काळ्या ढगात दडलेला चंद्र
हृदयाचा एक एक कप्पा उकलत
वरवर येतोय.
प्रकाशाची तिरीप
मनाला खोलवर भेदून जातेय.
थिजलेलं मन
वितळत चाललंय.
हवेत विरुन गेलेले
ओठावरचे शब्द
गीतात गोवण्याचा प्रयत्न करतेय.
हृदयाच्या तळमळीनं गीत गायचंय
तू स्वर होऊन येशील ?

●

## रंग

•

आकाशात रंगांची उधळण
कुणी केली, कशी केली
माहीत नाही.
एक चित्रह्रदय
नकळत तिकडे ओढल्या गेलं,
कुणीतरी रंग मुक्तहस्ते उधळले होते
अन् त्या फव्वाऱ्यात
मी रंगवेडी चिब भिजले.
एक गुलाबी रंगछटा
झळकून गेली,
उदास मनाला व्यथित करत गेली.
एकदा तुझ्या डोळयात हाच गुलाबी रंग
उतरला होता.
मी तेव्हा डोळे गच्च झाकून घेतले होते.
चंद्राच्या चंदेरी प्रकाशात
सगळे रंग चांदण्यासोबत मिटून गेले,
वितळून गेले;
अन् मी शोधत राहिले
तो ह्रदयाला स्पर्शून जाणारा रंग.
सांज डोळ्यावरुन सरकत जाताना
तो रंग डोळ्यातच विसरुन गेले
की मुद्दामच भरत गेले रंग ?
कळलं नाही.
मी डोळे पुन्हा मिटवू लागले
त्याला साठवण्यासाठी.
आता तो रंग माझ्या डोळ्यात
पूर्ण उतरला होता.

•

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 2436 / 28633 / 91286
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## नियम

●

मातीत मिसळलेल्या
गुलमोहराच्या पाकळ्या–
छिन्नविच्छिन्न, अस्ताव्यस्त;
मातीचे कण अंगावर घेत
दु:खात गढून गेल्यायेत,
स्वत:चे रंग हरवून बसल्यात,
लाल, पिवळा किंचित पांढरा
त्याग, कष्ट, सुचिता
ही तत्वे सांगता सांगता.

सगळे जीवनाचे रंगच उधळून गेलेत
तरीही
मातीतून वर आलेला गुलमोहर
आपल्या हृदयाचे तुकडे शेवटी
मिसळवतो मातीतच.

मातीतून उगवलेले मातीतच जाणार असते.
फरक एवढाच–
काही मेलेले जिणे जगतात,
कांही मरुन जगतात.

●

## सावल्या

●

सावल्या–
हलणाऱ्या, डुलणाऱ्या,
अंधाराच्या, उजेडाच्या.
चमकणाऱ्या, लुकलुकणाऱ्या
असंख्य सावल्या.

शून्यातून उमगणाऱ्या,
ध्येयप्रवाहात मिसळणाऱ्या,
अपेक्षांचे क्षितिज गाठताना
पुन्हा शून्यविश्वात परतणाऱ्या,
निराश मनाच्या
खिन्न सावल्या.

सावल्या तुमच्या आमच्या,
अखंड जीवनभर साथ देण्याचे
वचन देणाऱ्या,
मूक असून बोलणाऱ्या,
शेवटपर्यंत आपल्याच रहाणाऱ्या–
'सावल्या'

●

## मन मिटता मिटेना

●

हवं तेव्हा तोडलं,
नको तेव्हा जोडलं;
मनाशी हसण्याच्या सवयीनं
ग़ैरसमजाशी नातं जोडलं.
उगाच कुठेतरी पाहिलं,
डोळ्यात काहीतरी साठवलं;
कल्पनेच्या राज्यात
मन स्वत:लाच विसरलं.
मन असंच भरकटत गेलं,
विचारात गढून गेलं.
जग तेव्हा हसलं–
पण वेळ निघून गेली.
नातं तुटता तुटेना,
भावबंध सुटता सुटेना,
कितीही समजाविले तरी मना–
मन मिटता मिटेना.

●

# वर्तुळ

●

माझं जीवन हे आहे एक वर्तुळ
ज्यात कल्पनांचा चालू असती
शिवाशिवीचा खेळ.
वर्तुळाचा परिघ म्हणजे
आहेत जीवितमर्यादा
ज्यांच्या बंधनात मी वास्तव्य
करते सदान्‌कदा.

स्वप्नांचा महाल उभारणे
हाच आहे केंद्रबिंदू वर्तुळाचा.
स्वप्न सत्य करुन दाखविणे
हा अर्थच जीवनाचा.

मधूनच एखादी जीवा
केंद्रबिंदूला छेदून जाते–
मी भाववेडी मात्र त्याचा
विचारच करत बसते … …

●

## मंजिल

●

मनात कोरलेली
कल्पनेची मंजिल
सत्यतेत उतरताना
सत्यसुद्धा स्वप्न भासले,
आणि मंजिल गाठण्याच्या ध्येयाने
दूर दूर चालत राहिले,
दिवसासुद्धा स्वप्न उरी बाळगून.
वाट संपता संपेना तेव्हा
सारेच अर्ध्यावर संपवून,
स्वप्नाला स्थिरावून ठेवलंय
एकाच क्षणासाठी.

●

## जवळीक

●

दूरत्वाचे क्षितिज
हळूहळू जवळ येतंय.
काटचाकुटयांचे, दऱ्याखोऱ्यांचे रस्ते
अपेक्षांच्या गरूडझेपेने
पार केलेत.
सुखाच्या शिडकाव्याने
दु:खाची धगधग
थंडावल्यासारखी वाटली होती.
पण आजकाल
सुखाचेही चटके बसतात.
दु:ख अधिकच जवळ वाटतंय.
माझ्या दु:खा, तू फक्त
माझाच रहा.

●

# उद्या कदाचित

•

कालचे हे ओसाड रस्ते
आज फुलून आलेत,
उसनी माणुसकी घेतलेल्या माणसांनी
प्रत्येकजण प्रत्येकाला सांगतोय–
अरे, तू मझा कुणीतरी लागतोस,
नसलास जरी कुणी आप्त
एकाच धरतीची लेकरे आहोत.
कालपर्यंत गडद असलेल्या 'सीमारेषा'
घर, गाव, जात आणि राज्याच्या
आज पुसट झाल्याहेत.
तुझी आजपर्यंतची तृणसमान वेदना
ह्या क्षणाला
हृदय पिळवटून टाकतेय म्हणे 'त्यांचे'.
तुझ्यातल्या तुला तुझे स्वत्व शोधून
समोर येणाऱ्या उद्याचा
तुलाच विचार करायचाय.
कुणाच्या प्रतारणेत विरघळलास तर
उदया कदाचित... ...

•

## तुला न कळताच

●

माझे गीत तुला स्पर्शून जाणार आहे
हे माहीत असतं तर
मी छेडलेच नसते स्वर
शद्ब माझेच माझ्यात झंकारत.
तुझ्या मनातील हळूवार भाव
शद्वाशद्वातून डोकावत गेले
जसे रेशमी, मुलायम पाकळ्यांवर
दंव अलगद सांडत गेले.
तुझ्या हळव्या मनाची कल्पना न करताच
मी शद्वांची पेरण केली.
माझ्या अश्रूंनी लिहिलेली कविता तुझी
स्वरांत हरवून गाता गाता
अश्रूंतच सारी भिजून गेली
तुला न कळताच.

●

## ध्येय गवसल्यास

•

मन भरकटतंय, रडतंय,
जुन्या स्मृतींच्या अनुभवात हरवून जातंय.
पूर्वी डोळ्यांनी गाळलेल्या अश्रूंनीसुद्धा
मोती होऊन माझ्या नव्या जीवनात पदार्पण केलंय
मला सुखविण्यासाठी.

त्यांना काय माहीत माझ्या नशिबाचा खेळ ?
इथे मोत्यांनासुद्धा अश्रू व्हावं लागतं.
चार प्रेमांच्या शब्दांना आसुसलेल्या मनाला
व्यक्तीतलं अंतर समजतच नाही की
'हे सगळे जवळ असतानाही आपले कुणीच नाहीत'
विव्हलतेने मन हाक ऐकवतंय हृदयाची.

ऐकायला तयार कुणीच नसतं,
नंतर त्याला आठवतं की-दैवाने मागे खेचलंय मला,
काळानं लंगडं केलंय मला.
मी माझा भविष्यकाळ तरी
कोणत्या डोळ्यांनी पहावा ?

सध्या सगळंच अस्वस्थ आहे–
भूतकाळात जायचं नाही,
भविष्यकाळात रमायचं नाही,
वर्तमानात तर रडायला येते म्हणून हसायचंही नाही
सगळेच कसे शांत, स्तब्ध.
शब्द असून मी निशब्द.

ओठावर उसने हसू फुलवत
विचार न करता भावनांचा
आला दिवस काटायचा.
किनारा गाठायचाच ध्येयाचा
अर्थात – ध्येय गवसलच्यास.

●

# सायंतारा

•

तो सायंतारा
क्षणभर प्रकाशला,
रजनीच्या आगमनाची वर्दी देत
लुप्तही झाला.

लकाकला क्षणभरच
कशाची तरी आठवण देत.
काहीतरी विसरताना
हसण्याचं सांगून गेला.

ओठ विलग झाले
हसण्यासाठी.
डोळ्यावर तरळला
मालवून जातानाचा सायंतारा.

चेहऱ्यावर स्मितरेषा झळकल्या
दर्दभरे गहिरेपण भासवत.
" हसण्यामागचं दु:ख फारच
विलक्षण असतं नाही ? "

•

## गंधस्पर्श

●

तू ओंजळीत टाकलेल्या कळ्या
मी घरी नेताना
उगाच ओंजळ मिटून घेतली.
कळ्यांचा एक नि:श्वास
की निराशेचा श्वास
पोखरत गेला कुठेतरी.
द्रवलं हृदय थोडसं–
कळ्यांची फुले झाली.
ओंजळ सुटली, फुले सुकलीही.
पण हाताना स्पर्शून गेलेला गंध
आजही अस्वस्थ करतोय.

●

## पण तरीही.....

●

माहित नाही तुला
माझ्या डोळ्यातील अव्यक्त तृप्तता.
माहित आहे मला
असं डोळ्यात कुणाला साठवायचं नसतं–

पण तरीही... ...
माहित नाही तुला
तुझ्या वास्तव्याने चराचरातील अणूरेणू
पुलकित होतो ते.

माहित आहे मला
असं आपल कुणीही नसताना
कुणालाही जीव लावायचा नसतो.
पण तरीही... ...

माहित नाही तुला
कुणाला विसरण्यामागची दु:खाची तीव्रता.
मला तर दु:खाशिवाय काहीच माहित नाहीय.
पण तरीही... ...पण तरीही मी दु:खच शोधतेय

एका 'कटलेल्या' पतंगाला मला
धागा जोडायचाय - 'प्रेमाचा'.
तुला तर साधा त्याचा अर्थही
जपता नाही येत
मनाच्या कप्प्यात.
पण तरीही मी... ...

●

# संदर्भ

●

घरट्यात गुंतून राहिलेले
काही वेडे क्षण
फांद्यावरुन घरंगळणाऱ्या
पानांमागे
धावत असतात
वेड्या पाऊलखुणांचे
संदर्भ शोधत,

●

## शिल्प

•

दगडाच्या शिळेला
शिल्प बनायचं होतं—
एक अप्रतिम, अविस्मरणीय शिल्प.
तिनं सोसले कितीतरी
त्याच्यासाठी टाकीचे घाव,
अर्पून टाकले त्याला आपलं सर्वस्व.
मूर्तिकाराने जीव ओतून
शिल्प बनवलं—
दगडाच्या शिळेला
जीवन दिलं.
आणि शेवटी -
तिला एकदाच भरभरुन पाहून
चालायला लागला
दोन्ही हातांनी छाती गच्च धरुन.
—हृदयावर कोरलेलं तिचं शिल्प
कुणी हिरावून घेऊ नये
म्हणून.

•

# श्रावणसरी

•

अकल्पित श्रावणसरींनी कोसळून जावं
तशी तुझी आठवण मनात डोकावून जाते.
सूर्य मालवण्याआधीच पावसाळी ढगांनी
अंधार करावा
तशी माझी अस्वस्थता वाढत जाते.

कशाला दिलीस तू मला
सोबत ह्या अतर्क्य आठवणींची
एवढंच म्हणणं आता उरलंय हाती की
जीवनात चुकामूक झालीय दोन जीवांची.

तू आहेस तरी कोण ? कळत नाहीय मला.
दगड तर काही म्हणता येत नाही तुला
कारण माझ्या हृदयमंदिरातला
मीच देव केलाय तुला.

•

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५३६ / २८६३३ / ७।२।८६
शाखा (स्थळ प्रत)

# आठवण – 'एका क्षणाची'

●

वृक्षांच्या डहाळ्या
जेव्हा पानांचं नवं लेणं
लेवून येतात
आणि हिरव्यागार वृक्षांवर
नव्या, उल्हासी मनांचा उत्सव सुरु होतो
तेव्हा–
मला तुझी खूप आठवण येते
आणि एकदमच एकाकी होऊन
मी माझ्या मनातल्या
कोमेजलेल्या आठवणींना
त्या उत्सवात सामील होण्यासाठी
घेऊन जाते–
जिथे एक जुनं पान
सुखानं पहुडलेलं असतं
अगदीच बेजवाबदारपणे
ह्या सगळ्या जगापासून दूरस्थ.

पण–हे सगळ खरं आहे का ?
का माझ्या मनात कोसळणाऱ्या
श्रावणसरींचे शिडकावे ?
कदाचित हे कुणीच नाहीत,
हिरवी झाडेही नाहीत,
त्या डहाळ्यांच्या सुखद हालचालींचे
आवाजही नाहीत,
वसंतबहारही नाही, न ते सुखावलेलं पान
किंवा मीही नाही.

फक्त एक आठवण मात्र जरूर आहे.
माझ्या मनाच्या कोंदणात बसवलेली,
शांत आणि सुगंधानं न्हालेली–
जेव्हा तू मला बोलतं करण्यासाठी
थांबवलं होतंस एका क्षणासाठी–
'त्या क्षणाची'.

●

# डायरीत ठेवलेल्या

●

डायरीत ठेवलेल्या
ह्या फुलांप्रमाणेच
मनाच्या कप्यात काही आठवणी
मी जपून ठेवल्याहेत.

त्यातलीच एक आठवण
बकुळफूल होऊन आली आहे–
सुकलं तरीही सुगंध कायम ठेवणारी.

–तुझ्या डोळ्यात उमटलेल्या
माझ्या प्रतिमेची.
माझ्या हृदयावर कोरलेल्या
तुझ्या शिल्पाची.

●

## खेळ - विजयाविना

•

कुठे नेणार आहेत मला
या अंधारलेल्या वाटा ?
एकटीनेच चालायच्या आहेत मला
कुणाच्याही नसलेल्या वाटा.

तू कशाला चालशील ती वाट ?
कारण ती वाट तुझी कधी नव्हतीच.
मला झाला होता भास
म्हणून मी जन्मभर पाहिली तुझी वाट.

जीवनाचा अर्थ न कळताच
मी जीवन जगत राहिले;
कळत होतं की हा एक खेळ आहे
तरीही मी तो खेळच खेळत राहिले.
खेळच खेळले – विजयाविना.

•

## शलाका

•

लागताना सुखाच्या मागे
प्रीतीचे मी विणले धागे
करण्यासाठी अपेक्षापूर्ती
पूजिली मी अभंग मूर्ती

मी सुखात गुंतले असता
किरणशलाका भेदून गेली
एक शब्दातच संपवून सारे
अर्थ जीवनाचा सांगुन गेली

तूच जोडीले तूच तोडीले
अर्थाविना शब्द फुलविले
सत्यासत्याच्या घालून संगत
ठेविलीस मागे फक्त आठवण

मागे वळून पहाते आता मी
फक्त एकदाच डोळे भरभरुन
भविष्यातील वळणवाटा पार करताना
मागचं कांही दिसणार नाही म्हणून

जीवनात जे विसरण्याचा प्रयत्न करतेय
तेच हृदयावर कोरल्या जातं
एकच सत्य फक्त चिरंजीव आहे
की जगात संपत कांहीच नसतं.

•

## आपण दोघे

काय लिहू मी तुझ्यासाठी म्हणून–
सगळं तुझंच आहे तुझ्यात.
शब्दच अपुरे पडतात
तुझ्या प्रेमाला साचेबंद करण्यात.

तुझ्यामाझ्यात असलेलं शून्य अंतर–
हे शून्यच फार मोठं आहे.
दोघांनाही एकच क्षितिज गाठायचंय–
पण दिशा समांतर आहेत.

आज फार वाईट वाटतय की
आपण आयुष्यात दवडलीय एक संधी;
निराश मनाने आशा एकच धरायची की
काळचक्र उलटं फिरतं म्हणे कधी कधी.

ह्या काळाच्या उलट्या गतीत
दगडाचा देव बनून राही;
मग आपली सुकलेली जीवनबाग
कशासाठी फुलणार नाही ?

आता पुन्हा एकवार आनंदाने आपण
दु:ख आपले लपवून ठेवू;
आपण आपल्यालाच हवेत म्हणून
आयुष्य संपले तरी वाट पाहू ... ...

## प्रतिमा

•

सांज डोळ्यांत उतरत गेली
मालवत गेला एक एक दीप.
स्वप्नांचा प्रवास दूरचा–
झाडांच्या कुशीत विसावलेल्या पाखरांचा,
पानांचा, निद्रिस्त कळ्यांचा.
अन् रात्रीनंतर उमलून येणारा दिवस
धुकं विरुन क्षितिज दिसणारा.
पानांनी टिपलेले कळ्यांचे अश्रू–
पहाटेचे दवबिंदू–
साऱ्यांना गोवून घेणारा माझा श्वास,
तुझ्या नजरेत तराळलेली माझी प्रतिमा–
ही पण एक
'आठवणच'.

•

REFBK-0024833
REFBK-0024833

म. हिं. ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 2536 / 28633 / 9/2/८६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)